NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक १८.१०.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) कपीलनगर पोलीसांची कामगिरी :– नायलॉन मांजा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १८.१०.२०२६ चे १३.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर येथील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सुवर्ण नगर, कपीलनगर, नागपुर येथे राहणारा ईसम सचिन शाहु हा त्याचे घरासमोर शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, प्राप्त वर्णनाचा ईसम मिळुन आला त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नावे सचिन शिवकुमार शाहु, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३३३, सुवर्ण नगर, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. त्याचे जवळील बोरीची पाहणी केली असता, त्यामध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा मोनो काईट लेबल असलेल्या मांजाच्या एकुण १७ चक्की/कोन मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन एकुण १७ चक्की किंमती २५,५००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी रज्जाक नावाचा ईसम, वय ३५ वर्षे, रा. मोमीनपुरा, नागपुर याचेकडुन आणल्याचे सांगीतले. आरोपीचे कृत्य हे कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम–१९८६ अन्वये होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सतीष आडे, पोउपनि. प्रशांत राऊत, पोहवा. सुरेश मिश्रा, शहजाद शेख, पोअं. निलेश पवार, चंद्रशेखर, रितेश व सागर यांनी केली.



२) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.१०.२०२६ चे २२.१० वा. सुमारास, हुडकेश्वर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, बेसा पॉवर हाऊस मागील परिसरात, म्हाळगी नगर नाल्याजवळील एका टिनाचे शेडमध्ये पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे एक ईसम कापडी पिशवी सह मिळुन आला. त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शेख शाहरूख शेख ईस्राईल, वय २५ वर्ष, रा. प्लॉट नं. ७५, म्हाळगी नगर, हुडकेश्वर, नागपुर असे सांगीतले. त्याचे जवळील पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी ९३० ग्रॅम किमती ९,३००/— रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, मवपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, सपोनि. पपीन रामटेके, पोहवा. युवानंद कडु, सतीष, अविनाश, मुकेश, पोअं. ओमप्रकाश, गौरव, यशवंत व ऋषभ यांनी केली.

३) बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक १८.१०.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना सोमवार बाजार रोड, हरीहर नगर चौक, अंजना सावजी रेस्टॉरेंट समोर एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्याचे जवळ जात असतांना तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. त्याचा पाठलाग त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव तुषार उर्फ तुल्या राजेश राऊत, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ७३, शिवकृपा नगर, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. १७/२०२६ दिनांक ०९.०९.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्यांकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने व संशयीतरित्या समक्ष मिळुन आल्याने तसेच त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. रविंद्र नाईकवाड, पोउपनि. किशोर माळोकर, नारायण घोडके, पोहवा. सुहास शिंगणे, सुमेंद्र बोपचे व सचिन यांनी केली.

४) पोलीस उपायुक्त परि.क्र. ०२ पथकाची कामगिरी :— सट्टापट्टीवर जुगार खेळणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १७.१०.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, मा. पोलीस उपायुक्त परि.क्र. ०२ चे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, गौतम नगर, प्रेम फरसान मागे, भुषण किराणाजवळ पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी विजय दामाजी गायधने, वय ६५ वर्षे, रा. गौतम नगर, गिट्टीखदान, नागपुर हा डायमंड प्रभात नावाचे मटक्यावर पैश्याची बाजी

लावुन, आकड्यांची खायवडी करून, हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५९०/–रू., वेगवेगळ्या आकड्याच्या नोंदी असलेल्या सट्टापट्टी व मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण १६,६००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे कलम १२(अ) महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.२) यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. जावेद तडवी, पोहवा. विश्वास बलादे व संदीप सदाशिव यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नविन कामठी :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.१०.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, नविन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना कुंभारे कॉलोनी, टायसनचे घराजवळ, कामठी येथे एक गुलाबी शर्ट घातलेला ईसम शस्त्रासह संशयीतरित्या फिरत आहे, अशा माहीतवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव परवेझ खान प्यारेखान पठाण, वय ४५ वर्षे, रा. आझाद नगर, कामठी, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी शस्त्र किंमती ३००/– रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. विवेक दोरसेटवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. नखाते ९६३७२४१८९८ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे तहसिल :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी निखील केशवराव भोसकर, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३२, सिटी पोस्ट ऑफीस रोड, ईतवारी, नागपूर हे दिनांक २५.०७.२०२६ रोजी कस्टमरकडे सोलर लावण्याकरीता गेले. तेव्हा नेहमीप्रमाणे जिपीएस फोटो विथ लोकेशन हा ॲप उघडला असता, त्या ॲपवर त्यांना एफटीएमओ सि. एस. या ॲपवर मल्टीपल प्रॉफीट कमवा अशी जाहीरात दिसल्याने, त्यांनी ॲप डाऊनलोड करून, त्यावर अकाऊंट बनविले. व टेलीग्राम ॲपच्या एफटीएमओ सि एस या चॅनलला ज्वाईन झाले. एफटीएमओ सि एस या ॲपचे मालक व एजंट यांनी बनावट लिंकचा वापर करून, फिर्यादीस वेळावेळी पाठविलेल्या वेगवेगळ्या बॅक अकाऊंटवर फिर्यादीने दिनांक २५.०७.२०२६ ते दि. १४.१०.२०२६ दरम्यान, ट्रेडींग करीता विश्वासाने एकुण ८,२२,५००/–रू. जमा केले होते. फिर्यादीला ॲपवर ट्रेडींगमध्ये प्राफीट झाल्याचे दिसल्याने, त्यांनी विड्रॉल करण्यासाठी रिक्वेस्ट टाकली असता, एफटीएमओ सि एस ॲपचे मालक व एजंट यांनी वेगवेगळे कारणे देवुन, उडवाउडवीचे उत्तरे देवुन, फिर्यादींना कोणतीही रक्कम परत न करता, त्यांचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. महेंद्र वासनिक ९९२२३१०७१४ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

१) पोलीस ठाणे कळमना :– दिनांक १८.१०.२०२६ चे ००.३५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत चिखली चौक ते एच.बि टाऊन चौक रोड, इंडीयन ऑईल पेट्रोल पंपसमोर, सत्या बार चे बाजुला रोडवर मुलगा

नामे यश शामसुंदर सावल, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं. २१५, गोपालकृष्ण नगर, वाठोडा, नागपुर हा जखमी अवस्थेत पडलेला दिसला. जमलेल्या लोकांनी नमुद मुलगा हा पुलावरून अतीवेगाने वाहन चालवित जात असतांना त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, तो स्वत:हुन पुलावरून खाली पडल्याने जखमी झाल्याचे सांगीतले. पोलीसांनी लोकांचे मदतीने जखमी यास त्वरीत उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान ०२.०० वा. सुमारास डॉक्टरांनी तपासुन त्यांस मृत घोषीत केले. मृतकाची दुचाकी रॉयल इन्फील्ड हंटर क्र. एम.एच ४९ सि.वाय ९३९७ ही पुलावर मिळाल्याने पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आलेली आहे.

याप्रकरणी सरतर्फे पोहवा. संदेश शुक्ला, वय ४० वर्षे, पोलीस ठाणे कळमना यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. भरत गावित ९८३४५०२८७८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

२) पोलीस ठाणे नंदनवन :— दिनांक १८.१०.२०२६ चे ००.५० वा. चे सुमारास, मेयो हॉस्पीटल येथे कोणीतरी अज्ञात ईसमाने शेख ईस्माईल वय अं. ६५ वर्षे यांना बेशुध्द अवस्थेत हसनबाग येथुन आणुन उपचारार्थ दाखल करून तेथुन निघुन गेले. नमुद ईसमाचे पुर्ण नांव पत्ता मिळालेला नसुन, नमुद ईसमास उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. प्रदीप काईट यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फिर्यादी अमोल मनिराम झोडे, वय ३६ वर्षे, रा. संभाजी नगर, वर्मा चे घरी किरायाने, नरसाळा, हुडकेश्वर नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. लता अमोल झोडे, वय ३० वर्षे ह्या दिनांक १६.१०.२०२६ चे ०८.०० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान पासुन आपले राहते घरून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—गव्हाळ, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे व लांब, अंगात— काळ्या रंगाचा सलवार व ऑरेंज रंगाची ओढणी घातलेले आहे. भाषा— हिंदी, मराठी बोलतात.



सौ. लता

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.